13 JUL 2022 पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# भगवान महावीर अध्यासनास सर्व मदत

## स्वस्तिश्री लक्ष्मीसेन भट्टारक पट्टाचार्य यांची ग्वाही

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठाच्या भगवान महावीर अध्यासन केंद्राच्या इमारत निधी संकलन समितीचे अध्यक्ष डॉ. जे. एफ. पाटील, तसेच सुरेश रोटे, संजय शेटे, प्रा. संदीप पाटील आणि अध्यासन केंद्राचे प्रमुख डॉ. विजय ककडे यांनी स्वस्तिश्री लक्ष्मीसेन भट्टारक पट्टाचार्य यांची भेट घेतली. त्यांनी प्रस्तावित इमारतीस सर्व प्रकारची मदत देऊ, अशी ग्वाही दिली.

जैन समाजातील युवकांचे शैक्षणिक व व्यावसायिक सक्षमीकरण करण्यास प्राधान्य देणार असून, आगामी दहा वर्षांत आपल्या कार्याचा हा केंद्रबिंदू असल्याचे मत त्यांनी व्यक्त केले.



**कोल्हापूर : स्वस्तिश्री लक्ष्मीसेन भट्टारक पट्टाचार्य यांच्या भेटीप्रसंगी डॉ. जे. एफ. पाटील, सुरेश रोटे, संजय शेटे, प्रा. संदीप पाटील, डॉ. विजय ककडे.**

डॉ. पाटील व डॉ. ककडे यांनी अध्यासनाच्या कार्याची माहिती दिली. संजय शेटे यांनी शासनामार्फत मिळणाऱ्या निधीसाठी पाठपुरावा करू, असे स्पष्ट केले. स्वस्तिश्री लक्ष्मीसेन भट्टारक पट्टाचार्य यांनी विद्यापीठास भेट देण्याचे आमंत्रण स्वीकारले आहे.

13 JUL 2022
तरुण भारत
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर


# महावीर अध्यासनास भट्टारक लक्ष्मीसेन महास्वामी करणार मदत

## शिवाजी विद्यापीठातील भगवान महावीर अध्यासनासाठी निधी संकलन समितीला आश्वासन

**प्रतिनिधी**
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठातील भगवान महावीर अध्यासनाच्या इमारतीसाठी निधी संकलन सुरु आहे. निधी संकलन समितीचे अध्यक्ष डॉ. जे. एफ. पाटील, सुरेश रोटे, संजय शेटे, प्रा. संदीप पाटील, अध्यासन केंद्रप्रमुख डॉ. विजय ककडे यांनी प. पू. स्वस्तिश्री लक्ष्मीसेन भट्टारक पट्टाचार्य यांची भेट घेतली. या भेटी दरम्यान चर्चा करताना प. पू. भट्टारक यांनी अध्यासनाच्या इमारतीस सर्वोत्परी मदत देण्याचे आश्वासन दिले आहे. तसेच जैन समाजातील युवकांचे शैक्षणिक व व्यावसायिक सक्षमीकरण आपल्या कार्याचा हा केंद्रबिंदू असल्याचे त्यांनी सांगितले.

डॉ. जे. एफ. पाटील व डॉ. विजय ककडे यांनी अध्यासनामार्फत करीत असलेल्या कार्याची माहिती दिली. तसेच संजय शेटे यांनी शासनामार्फत मिळणाऱ्या निधीसाठी पाठपुरावा करू असे सांगितले. विद्यापीठामार्फत प. पू. स्वस्तिश्री लक्ष्मीसेन भट्टारक पट्टाचार्य यांचा सन्मान करण्यात आला. तसेच प. पू. भट्टारक यांनी सर्व सदस्यांना मठाचे महावस्त्र व श्रीफळ देऊन शुभाशिर्वाद दिले. लक्ष्मीसेन भट्टारक महास्वामींनी विद्यापीठाला भेट देण्याचे आमंत्रण स्वीकारले आहे.



**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील भगवान महावीर अध्यासन इमारत निधी संकलन समितीच्या पदाधिकाऱ्यांना शुभाशिर्वाद देताना प. पू. स्वस्तिश्री लक्ष्मीसेन भट्टारक पट्टाचार्य महास्वामी.**

पुण्यनगरी



# मास कम्युनिकेशनच्या विद्यार्थ्यांचा अभ्यास दौरा

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या मास कम्युनिकेशनच्या विद्यार्थ्यांनी अभ्यास दौऱ्यात इंदूर (मध्य प्रदेश) येथील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे जन्मगाव महू मध्य प्रदेश येथील स्मारकास भेट दिली. यावेळी २७ विद्यार्थ्यांसह समन्वयक प्रा. डॉ. निशा पवार, डॉ. सुमेधा साळुंखे सहभागी झाले. यावेळी डॉ. संदीप भट्ट, डॉ. अरुण कंगुरी, स्मारक कार्यकर्त्या दीपाली वाघमारे उपस्थित होते.

13 JUL 2022 पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# राज्यातील ५४ शेतकरी देताहेत रेशीमशास्त्राची परीक्षा

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठाच्या प्राणीशास्त्र अधिविभागात मंगळवारपासून रेशीमशास्त्र पदव्युत्तर पदविका आणि पदविका या अभ्यासक्रमांच्या परीक्षांना प्रारंभ झाला. विशेष म्हणजे या ऑफलाईन परीक्षेसाठी सिंधुदुर्गापासून ते चंद्रपूरपर्यंतचे ५४ शेतकरी उपस्थित राहिले.



**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात रेशीमशास्त्र पदविका परीक्षेसाठी राज्यभरातून उपस्थित शेतकरी विद्यार्थी.**

शिवाजी विद्यापीठाच्या प्राणीशास्त्र अधिविभागात सेंटर ऑफ एक्सलन्स अँड इनक्युबेशन इन सेरिकल्चरची स्थापन २०१७-१८ मध्ये करण्यात आली. त्यावेळी सेंटरमध्ये रेशीमशास्त्र पदव्युत्तर पदविका व पदविका अभ्यासक्रम सुरू करण्यात आले.

मराठवाडा, विदर्भातील शेतकऱ्यांनी प्रवेश घेऊन परीक्षा उत्तीर्ण केली. यंदाही सिंधुदुर्गापासून ते चंद्रपूरपर्यंतचे शेतकरी प्रवेशित झाले आहेत.

सेंटरचे समन्वयक डॉ. ए. डी. जाधव म्हणाले, सर्व शेतकरी विद्यार्थी आत्मविश्वासाने परीक्षेला सामोरे जात आहेत, हीच या अभ्यासक्रमाच्या यशाची पोचपावती आहे, असे मी मानतो. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के आणि प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांनी त्यासाठी केलेले मार्गदर्शन व प्रोत्साहन मोलाचे ठरले.

13 JUL 2022 तरूण भारत जनसंपर्क कक्ष शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# राज्यातील ५४ शेतकऱ्यांनी दिली रेशीमशास्त्र परीक्षा


## रेशीमशास्त्र अभ्यासक्रमाला शेतकऱ्यांचा चांगला प्रतिसाद

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठातील प्राणीशास्त्र अधिविभागातील रेशीमशास्त्र पदव्युत्तर पदविका आणि पदविका या अभ्यासक्रमांच्या परीक्षांना मंगळवारपासून प्रारंभ झाला. सिंधुदुर्ग, चंद्रपूरसह राज्यभरातील ५४ शेतकऱ्यांनी ही ऑफलाईन परीक्षा दिली.

शिवाजी विद्यापीठातील प्राणीशास्त्र अधिविभागात सेंटर ऑफ एक्सलन्स अँड इनक्युबेशन इन सेरिकल्चरची स्थापना २०१७-१८ मध्ये झाली. त्यावेळी सेंटरमध्ये रेशीमशास्त्र पदव्युत्तर पदविका व पदविका अभ्यासक्रम सुरु केले. पहिल्या वर्षापासूनच या अभ्यासक्रमांना राज्यभरातील शेतकऱ्यांचा चांगला प्रतिसाद मिळत आहे. मराठवाडा, विदर्भातील शेतकऱ्यांनी प्रवेश घेऊन परीक्षा उत्तीर्ण केली. एक वर्षाच्या या अभ्यासक्रमांसाठी दहा हजार रुपये शुल्क भरून शेतकरी प्रवेश घेतात आणि परीक्षाही देतात. यंदाही सिंधुदुर्गपासून ते चंद्रपूरपर्यंतचे शेतकरी प्रवेशित झाले आहे. सध्या पाऊस मोठ्या प्रमाणात असूनही राज्याच्या विविध जिल्ह्यातील शेतकरी परीक्षेसाठी उपस्थित राहिले आहेत. या तरुण शेतकऱ्यांकडे रेशीम शेतीसाठी लागणारी अनेक कौशल्ये आहेत. शास्त्रीय कौशल्य आणि तंत्रज्ञानाच्या माहितीची जोड मिळाल्यास रेशीम शेतीमध्ये कोशांची गुणवत्ता आणि उत्पादकता वाढविता येते.

शास्त्रीय ज्ञान मिळाल्यामुळे शेतकऱ्यांचा रेशीम शेतीतील आत्मविश्वास वाढतो आणि त्यांच्या एकूण उत्पादनात आणि अर्थशास्त्रात मोठा बदल होतो. याच कारणांसाठी शेतकऱ्यांमध्ये हा अभ्यासक्रम लोकप्रिय झाला आहे. सहावी उत्तीर्ण शेतकरी आणि रेशीम शेतीतील तीन वर्षांचा अनुभव असलेल्यांना प्रवेशासाठी प्राधान्य दिले जाते.



**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील प्राणीशास्त्र अधिविभागातील रेशीमशास्त्र पदव्युत्तर पदविका आणि पदविका अभ्यासक्रमाची परीक्षा देताना शेतकरी.**

### सर्व विद्यार्थी परीक्षा देतात हेच यश

सर्व शेतकरी विद्यार्थी मोठ्या उत्साहाने व आत्मविश्वासाने परीक्षेला सामोरे जात आहेत. शंभर टक्के विद्यार्थ्यांनी या अभ्यासक्रमाची परीक्षा दिली, हीच यशाची पोहोचपावती आहे. या अभ्यासक्रमामुळे त्यांचा आत्मविश्वास वाढून त्यांची उद्यमशीलता, व्यावसायिकता आणि स्वावलंबन हे गुणही शेतीतून सिद्ध करतात. या अभ्यासक्रमासाठी कुलगुरू डॉ. डी.टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांचे मार्गदर्शन व प्रोत्साहन लाभले.

**- डॉ. ए. डी. जाधव (समन्वयक, रेशीमशास्त्र अभ्यासक्रम)**

13 JUL 2022 लोकमत जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# इस्लामपूरच्या आरआयटीने केले बैलांच्या मानेवरील ओझे हलके...

## बैलपोळ्याची अनोखी भेट : बैलगाडीसाठी बनविला रोलिंग सपोर्टर

लोकमत न्यूज नेटवर्क

**इस्लामपूर :** लोकमत न्यूज नेटवर्क

**इस्लामपूर :** कृषी संस्कृतीतील बैलांचे कष्ट समोर ठेवत येथील राजारामबापू इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नालॉजी (आरआयटी )मधील अभियांत्रिकीच्या विद्यार्थ्यांनी त्याच्या मानेवरील ओझे कमी करणारी बैलगाडी तयार करून शेतकऱ्यांना बैलपोळ्याची भेट दिली आहे.

महाविद्यालयाच्या ऑटोमोबाईल अभियांत्रिकी विभागाच्या शेवटच्या वर्षामध्ये शिक्षण घेणाऱ्या सौरभ भोसले, आकाश कदम, निखिल तिपायले, आकाश गायकवाड आणि ओमकार मिरजकर या विद्यार्थ्यांनी बैलगाडीसाठी रोलिंग सपोर्ट बनवत बैलाच्या मानेवरील ओझे कमी करणारी किमया साधली आहे. या संशोधक विद्यार्थ्यांनी 'सारथी' या नावाने हा प्रकल्प पूर्ण केला.



इस्लामपूरच्या 'आरआयटी'मधील अभियंत्यांनी बैलगाडीस असा रोलिंग सपोर्ट बसविण्याचा प्रयोग यशस्वी केला.

### पेटंटसाठी अर्ज सादर

संशोधन निधी अंतर्गत या प्रकल्पासाठी १० हजार रुपये निधी मिळाला आहे. या रोलिंग सपोर्ट प्रकल्पाचे पेटंट मिळवण्यासाठी अर्ज केला आहे. डॉ. सुप्रिया सावंत यांनी मार्गदर्शन केले आहे. त्याचबरोबर प्रा. पी. एस. घाडगे व ऑटोमोबाईल विभागाचे प्रमुख डॉ. एस. आर. कुंभार यांचे सहकार्य लाभले.

महाराष्ट्रात २०० साखर कारखाने आहेत. त्यातील बहुतांश बैलगाड्या जवळच्या भागातून ऊस वाहतूक करत असतात. शेतात ऊस भरताना लावला लाकडी घोडा जमिनीत घुसणे व मोडणे, बैलांवर अतिभार, रस्त्यांवरील गतिरोधक, खड्ड्यांमुळे पाय मुरगळणे व कधी-कधी पाय मोडणे अशा समस्यांना तोंड द्यावे लागते. त्यामुळे बैलाला दुखापत तसेच बैलचालकाचे आर्थिक नुकसान होते. त्यावर विद्यार्थ्यांनी अफलातून संकल्पना साकारत कामाला सुरुवात केली.

त्यांनी दोन्ही बैलांमध्ये तिसरे चाक बसवले जे बैलांवरचा भार कमी करते आणि बैलगाडीसाठी पूर्ण संतुलन देते, हा रोलिंग सपोर्ट बैलांच्या उंचीनुसार कमी-जास्त आणि वर खाली करू शकतो. त्याचा उपयोग ऊस भरताना खाली व शेतातून वाहतूक करताना वर अडकवू शकतो. त्यातून बैलांवरील ओझे कमी करण्यात यश आले आहे. या प्रकल्पाची चाचणी ऊस भरताना व रस्त्यावरून वाहतूक करताना केली आहे. येणाऱ्या गळीत हंगामात या प्रयोगाची प्राथमिक अंमलबजावणी करण्यात येणार आहे.

महाविद्यालयाच्या संचालिका डॉ. सुषमा कुलकर्णी, डॉ. ए. बी. काकडे, डॉ. एल. एम. जुगुलकर, प्रा. सुधीर आरळी आणि प्रा. हर्षल पाटील यांनी अभिनंदन केले. कासेगाव एज्युकेशन सोसायटीचे सचिव आर. डी. सावंत व नियामक मंडळाचे अध्यक्ष भगतसिंह पाटील यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक केले.

13 JUL 2022 पुढारी
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# यंदा शिवाजी विद्यापीठ पदवीधर नोंदणीचा विक्रमी

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठातर्फे सुरू असलेली पदवीधर मतदार नावनोंदणी सोमवारी संपली. ४९ हजार ९३९ मतदारांनी नावनोंदणी केली आहे. शिक्षक २०८, महाविद्यालय २७७, विभागप्रमुख १९५, महाविद्यालय प्राचार्यांची आणि ११८ व्यवस्थापन प्रतिनिधींची ऑनलाईन नोंदणी झाली आहे. विद्यापीठाच्या इतिहासात पहिल्यांदाच मोठ्या प्रमाणात मतदार नोंदणी झाल्याने विद्यार्थी संघटना, शिक्षण संस्थांकडून समाधान व्यक्त होत आहे.

विद्यापीठ विविध अधिकार मंडळासाठी सप्टेंबर-ऑक्टोबरमध्ये निवडणुका होणार आहेत. त्यासाठी पदवीधर ऑनलाईन मतदार नोंदणी प्रक्रिया राबविण्यात आली. गतवर्षी १७ हजार मतदार मतदानासाठी पात्र ठरले होते. यंदा ४९ हजार ९३९ पदवीधर मतदारांनी ऑनलाईन नोंदणी केली आहे. आतापर्यंतच्या विद्यापीठाच्या इतिहासात मतदारांच्या संख्येत तीनपटीने वाढ झाली आहे. १५ जुलैपर्यंत विद्यापीठातील निवडणूक विभागात ऑनलाईन अर्जाची प्रिंट जमा करावयाची आहे. सध्या प्राप्त अर्जाची छाननीची प्रक्रिया सुरू आहे. छाननीनंतर तात्पुरती मतदार यादी जाहीर होईल. त्यावर हरकती आणि दुरुस्तीनंतर अंतिम मतदार यादी जाहीर केली जाईल.

13 JUL 2022

पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर



## विज्ञानाच्या विश्वात

डॉ. व्ही.एन. शिंदे

# दरडी का कोसळतात?

काही वर्षांपासून दरडी कोसळण्याचे प्रमाण वाढले आहे. यावर्षीही पावसाळा सुरू झाला आणि दरडी कोसळण्याच्या बातम्या येऊ लागल्या. लाल मातीच्या सह्याद्रीच्या डोंगररांगात, कोकणात हे प्रमाण जास्त आहे. दरड कोसळली की महामार्ग, रेल्वे वाहतूक थांबते. वाहने जाताना दरड कोसळून जीवितहानी, संपत्तीचे नुकसान होते. माणसाची काही काळासाठी का होईना, त्या मार्गावरील गती थांबते. त्यामुळे दरड कोसळली की, माध्यमे मोठ्या बातम्या प्रसिद्ध करतात. भविष्यात दरड कोसळण्याच्या घटनांमध्ये वाढच होण्याची शक्यता आहे. म्हणूनच दरड का कोसळते? हे समजून घेणे आवश्यक आहे.

दरड म्हणजे डोंगराची तीव्र कडा. असे नैसर्गिक तीव्र कडे फारच कमी असतात आणि आहेत त्या कठीण दगडांचा डोंगर फोडून लोहमार्ग किंवा रस्ता बनवताना, रस्त्याच्या दोन्ही बाजूला दरडी तयार होतात. किमान एका बाजूला दरड राहते. डोंगरातून रस्ते बनवताना बहुतांश दरडी तयार झाल्या आहेत. दरडी नैसर्गिक आणि कृत्रिम कारणांनी कोसळतात. भूकंपासारख्या नैसर्गिक आपत्तीवेळी जमीन खचते म्हणजेच भूस्खलन होते. अशा भूस्खलनावेळी दरड नैसर्गिकरित्या कोसळते. अशा घटना अपवादात्मक आहेत. मोठ्या प्रमाणात मातीचा ढीग किंवा खडक फुटून कडा कोसळतो, त्यास दरड कोसळणे म्हणतात. नैसर्गिकरित्या कठीण पाषाणात असणाऱ्या भेगा किंवा फटी असतात. ऊन, वारा पाऊस यांचा परिणाम होऊन खडकाचे तुकडे होतात. या भेगा वाढून त्यामध्ये पाणी साठले की, दगडाचे किंवा भूभागाचे वजन वाढते आणि तो खडक उताराच्या बाजूने घसरतो. ही नैसर्गिक दरड कोसळण्याची प्रक्रिया असते. सध्या दरड कोसळल्याच्या येणाऱ्या बातम्या या कृत्रिम कारणांनी दरड कोसळल्याच्या आहेत. काही वर्षांपूर्वी माळीण गाव पूर्ण गाडले गेले होते. ती घटना सुरुवातीला नैसर्गिक मानली जात होती. मात्र, ती घटनासुद्धा कृत्रिम कारणाने घडली होती. माणसाचा निसर्गातील अवाजवी हस्तक्षेप आणि विकासाच्या चुकीच्या पद्धतीमुळे या घटना घडतात. निसर्गात आढळणाऱ्या सर्व पदार्थांना एकत्रित बांधून ठेवण्याचे कार्य करणारी बले असतात. एकाच प्रकारच्या रेणूंना किंवा अणूंना संसजी (cohesive) बले बांधून ठेवतात. पाणी आपणास द्रव रूपात मिळते; कारण पाण्याच्या रेणूंमध्ये संसजी बल असते. सोन्याचे दागिने बनवता येतात, कारण त्याच्या अणूंमध्ये संसजी बल पाण्यापेक्षा जास्त असते. दोन भिन्न प्रकारच्या रेणूंमध्ये असंसजी



(Adhesive) बल असते. या बलांमुळे पाण्याचे रेणू पात्राला चिकटून रहातात. असंसजी बलामुळे दगड आणि माती एकत्र राहतात. संसजी किंवा असंसजी बल जितके जास्त असेल तितका तो पदार्थ कठीण बनतो. मातीमध्ये असणाऱ्या कणांमध्ये संसजी बल कमी असल्याने मातीचे कण सहज वेगळे होऊ शकतात. दगडाच्या कणातील बल मातीपेक्षा जास्त असल्याने दगड कठीण असतो. दगड आणि माती यांनी बनलेल्या दरडी कोसळण्याची शक्यता जास्त असते. कठीण खडकांच्या दरडी कोसळण्याची शक्यता कमी असते. माती आणि दगडातील संसजी आणि असंसजी बले जास्त नसले तरी अनेक वर्षांपासून एकाच ठिकाणी स्थिर पडलेले असते. त्यावर उगवलेले गवत, मातीला आणि झाडांची मुळे दगड, मातीला घट्ट पकडून ठेवतात. नैसर्गिकरित्या तयार झालेल्या उतारावरून पावसाचे पाणी वाहून जाते. त्यात मातीचा अंश फार कमी असतो. मात्र, मानवाने मोठ्या प्रमाणात वृक्षतोड केली. शेतीसाठी डोंगर माथ्यावरील झाडे तोडली. गवताचे आवरण नष्ट केले. डोंगरमाथ्यावरील बांधामुळे माथ्यावर पाणी साठू लागले. हे पाणी डोंगरावर असणाऱ्या भेगांमध्ये मुरते. या पाण्यामुळे माती सुटी होते; कारण माती आणि पाण्याच्या रेणूमध्ये असंसजी बल दगड आणि मातीतील बलापेक्षा जास्त असते. दगडाला पकडून ठेवणारी माती सुटी झाली की, दगड गुरुत्वाकर्षण बलामुळे चिखलात रुतायला सुरुवात होते आणि दगड माती सगळे काही गुरुत्वीय बलांमुळे खाली घसरत येते आणि दरड कोसळते.

रस्ते बनवताना, लोहमार्ग तयार करताना कमीत कमी वेळेत काम पूर्ण करण्यासाठी जास्त ताकतीची यंत्रे वापरण्यात येतात. या यंत्रांच्या बसणाऱ्या धक्क्यांमुळे दरड तयार होताना, दरडींमध्ये असणाऱ्या दगड आणि मातीमध्ये भेगा पडतात. या भेगांमधून पाणी मुरते आणि पावसाळ्यात दरडी कोसळतात. जेथे दगड आणि मातीच्या दरडी असतात, तेथे काँक्रीट आवरण घालून धोका कमी करणे आवश्यक बनते. २०२२ साल 'शाश्वत विकासासाठी विज्ञान आणि तंत्रज्ञाना'चे वर्ष म्हणून साजरे करण्यात येत आहे. शाश्वत विकास म्हणजे निसर्गाला कमीत कमी हानी पोहोचवणे होय. रस्ते आणि लोहमार्ग बनवताना निसर्गाला कमीत कमी हानी पोहोचावी म्हणून अवजड यंत्राऐवजी जास्त मनुष्यबळ वापरायला हवे.

संपर्क : ९६७३७८४४००
vilasshindevs44@gmail.com

पुण्यनगरी

# पदवीधरच्या विक्रमी नोंदणीने रंगत वाढणार

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठ प्रशासनातर्फे नोंदणीकृत पदवीधर नोंदणी व नोंदणीकृत पदवीधर मतदार नोंदणी ऑनलाईन पद्धतीने घेण्यात आली. यावेळी ४८ हजार ५७० या विक्रमी संख्येने पदवीधरांनी नोंदणी केली. विद्यापीठ कार्यक्षेत्रातील कोल्हापूरसह सांगली व सातारा जिल्ह्यांतील विविध पक्ष संघटनांच्या प्रयत्नांमुळे यंदाची नोंदणी वाढली आहे. या वाढलेल्या नोंदणीमुळे सिनेट निवडणूकीमध्ये रंगत वाढणार आहे. त्याचबरोबर वाढलेली नोंदणी कोणाच्या पथ्यावर पडणार, अशी चर्चा विद्यापीठ वर्तुळात सुरू आहे.

शिवाजी विद्यापीठाच्या सिनेट निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर संबंधित विविध घटकांकडून निवडणुकांची तयारी सुरू आहे. त्यासाठी अधिकाधिक पदवीधरांची नोंदणी व्हावी, यासाठी सर्वच विद्यार्थी संघटना तसेच पक्षांतर्फे विशेष प्रयत्न करण्यात आले, तर इच्छुकांनी स्वतंत्र यंत्रणा राबवत नोंदणी करून घेतली.

विद्यापीठ कार्यक्षेत्रातील तिन्ही जिल्ह्यांत अधिकाधिक नोंदणीसाठी राजकीय पक्ष, नेते, तसेच विद्यार्थी संघटनांनी कंबर कसली होती. पदवीधरांपर्यंत पोहोचून त्यांना नोंदणीसाठी प्रोत्साहित केले जात होते, तर नोंदणीसाठी आवश्यक मदत ही केली जात होती. काही संघटनांनी नोंदणी करण्याची जबाबदारी स्वतःकडेच घेतली. त्यामुळे यंदाच्या पदवीधर नोंदणीमध्ये लक्षणीयरीत्या वाढ झालेली आहे.

## वाढ कोणाच्या पथ्यावर?

काही संघटनांनी आपल्याला होईल अशाच मतदारांची नोंदणी केली आहे, तर काही संघटनांचा संख्या वाढवण्यासाठी नोंदणी करण्याकडे कल होता. त्यामुळे ही वाढलेली नोंदणी कोणाच्या पथ्यावर पडणार, अशी चर्चा सध्या सुरू आहे. तसेच नोंदणी नंतर प्रत्यक्ष मतदानावेळी अधिकाधिक मतदार बाहेर काढण्याचे आव्हान या संघटनांसमोर आहे.

## नोंदणी वाढली, पण

यंदा पदवीधरांची संख्या लक्षणीयरीत्या वाढली आहे; मात्र नोंदणी झाली असली तरी झालेली नोंदणी व प्रत्यक्षात झालेले मतदान यामध्ये मोठी तफावत अढळते. यावेळी संघटना तसेच कार्यकर्त्यांच्या आग्रहामुळे चांगली नोंदणी झाली आहे; मात्र त्यापैकी प्रत्यक्षात किती मतदान होणार, हे पाहणे औत्सुक्याचे ठरणार आहे.

तरुण भारत

# ४९९३९ पदवीधर मतदारांची ऑनलाईन नोंदणी

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठाने पदवीधर मतदार नावनोंदणी सोमवारी संपली असून ४९ हजार ९३९ मतदारांनी नावनोंदणी केली. तसेच शिक्षक २०८, महाविद्यालय २७७, विभागप्रमुख १९५, महाविद्यालय प्राचार्यांची आणि ११८ व्यवस्थापन प्रतिनिधींची ऑनलाईन नोंदणी झाली आहे. विद्यापीठाच्या इतिहासात पहिल्यांदाच इतकी मतदार नोंदणी झाल्याने विद्यार्थी संघटना, शिक्षण संस्थांकडून समाधान व्यक्त होत आहे. १५ जुलैपर्यंत विद्यापीठातील निवडणूक विभागात ऑनलाईन अर्जाची प्रिंट जमा करावयाची आहे.

शिवाजी विद्यापीठातील विविध अधिकार मंडळासाठी सप्टेंबर–ऑक्टोबरमध्ये निवडणुका होणार आहेत. गतवर्षी १७ हजार मतदार मतदानासाठी पात्र ठरले होते. यंदा ४९९३९ पदवीधर मतदारांनी ऑनलाईन नोंदणी केली.



▪ विद्यापीठाच्या इतिहासात प्रथमच विक्रमी नोंदणी

आतापर्यंतच्या इतिहासात मतदारांच्या संख्येत तीनपटीने वाढ झाली आहे. सध्या प्राप्त अर्जांची छाननी प्रक्रिया सुरू आहे. छाननीनंतर कच्ची मतदार यादी तर हरकती आणि दुरूस्तीनंतर पक्की मतदार यादी जाहीर केली जाईल. त्यानंतरच मतदारांचा अंतिम आकडा जाहीर होईल. मतदान केंद्रांची संख्या वाढवायची की नाही, याचा निर्णय घेतला जाईल. सध्या त्यानुसार शहाजी कॉलेज, कॉमर्स कॉलेज, सायबर कॉलेज ही मतदार केंद्र आहेत.